महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004

दूरध्वनी – 020 25660593
ई-मेल – dycfpune@gmail.com

क्रमांक-अ/कक्ष-4-2/जमीन/ 475 /2023-24,
दिनांक - 07 / 07 / 2023.

पत्र .

प्रति,

मुख्य वनसंरक्षक,(प्रा.)
पुणे.

विषय:- वनजमीन-पुणे
पाण्याची पाईपलाईन टाकण्याकरिता ता.इंदापूर, जि.पुणे येथील 0.83 हे. राखीव वनजमीन वळती करणेबाबत.

संदर्भ- 1) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्रं.एफएलडी-1923/ प्र.क्र.92/फ-10, दिनांक 10.04.2023.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपूर यांचेकडील पत्र क्रं.कक्ष-17/नोडल/पुणे/आयडी-13074(25)/131, दि.13.04.2023.
3) मुख्य वनसंरक्षक,(प्रा.)पुणे यांचेकडील पत्र क्रं.4/4(2)/जमीन/FCA-393/B182/2023-24,दि.25.04.2023.
4) या कार्यालयाचे पत्र क्रं.ब/कक्ष-4-2/जमीन/1314/2023-24, दि.06/07/2023.
5) बाळासाहेब सोनवणे व्यवस्थापक (HR & Admin) BGPPL-Unit Bhigwan यांचेकडील पत्र क्रं.Forest Proposal/BGPPL/2023-24, दि.07.07.2023.
6) वनपरिक्षेत्र अधिकारी,इंदापूर यांचेकडील पत्र क्रं.जमिन/523/2023-24, दि.06.07.2023.

विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्रं.1 अन्वये शासनाने 5 मुद्यांवर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. संदर्भिय पत्र 4 अन्वये सदर शासन पत्रातील 5 मुद्यांची माहिती तात्काळ सादर करणेबाबत प्रकल्प यंत्रणा यांना कळविण्यात आलेले होते तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी,इंदापूर यांनाही कळविण्यात आलेले होते.

संदर्भ क्रं.5 अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी खालीलप्रमाणे 5 मुद्दयांची माहिती या कार्यालयास सादर केली असून, संदर्भ क्रं.6 अन्वये वनपरिक्षेत्र अधिकारी,इंदापूर यांनी त्यांचेकडील अहवाल या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. संदर्भ क्रं.5 व 6 अन्वये प्राप्त माहितीचे अधारे खालीलप्रमाणे 5 मुद्यांची माहिती सादर करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | उपस्थित मुद्दे | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावामध्ये प्रस्तावित क्षेत्र ०.८३ (०.८२९९) हे. नमूद आहे. परंतु, प्रकल्पयंत्रणेने ऑनलाईन पार्ट-१ मध्ये वळतीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्र ०.८२४६ हे. असे नमूद केले आहे. त्यामुळे सुधारित ऑनलाईन पार्ट-१ सादर करावा. | संदर्भ क्रं.5 अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी ०. ८३ (०. ८२९९) हे. क्षेत्र दर्शविणारा सुधारित ऑनलाईन पार्ट-१ सादर केला असून तो सोबत जोडला आहे. **Annexure-i.** |
| 2. | सदर प्रकरणी वनभंग झाला असल्यामुळे दंडनीय नक्त वर्तमान मूल्याची रक्कम व दंडनीय पर्यायी वनीकरणासाठीची रक्कम भरण्यासंदर्भात प्रमाणपत्र सादर करावे. | संदर्भ क्रं.5 अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी दंडनीय नक्त वर्तमान मूल्याची रक्कम व दंडनीय पर्यायी वनीकरणासाठीची रक्कम भरण्यासंदर्भात प्रमाणपत्र अनुक्रमे **Annexure-ii** आणि **Annexure-iii** सादर केलेले सोबत जोडलेले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| 3. | प्रस्तावित क्षेत्र संरक्षित क्षेत्रापासून १०.०० कि.मी. पेक्षा अधिक अंतरावर असल्याचे उपवनसंरक्षक यांनी प्रमाणित केले आहे. परंतु, kml file चे अवलोकन केले असता, प्रस्तावित क्षेत्र कुंभारगाव पक्षी अभयारण्यापासून सुमारे ५००.०० मीटर अंतरावर असल्याचे दिसून येते. तरी, सदर प्रकल्प संरक्षित क्षेत्र व त्याच्या ESZ चा भाग हे किंवा कसे, याबाबत खात्री करावी. संरक्षित क्षेत्र व त्याच्या ESZ चा भाग असल्यास उपशमन योजना / वन्यजीव मंजुरी घेणे आवश्यक राहील किंवा कसे, याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घेऊन त्याप्रमाणे माहित सादर करावी. | संदर्भ क्रं.5 व 6 अन्वये कुंभारगाव पक्षी अभयारण्य घोषित झाले असल्याचे कोणतेही शासन राजपत्र प्रकल्प यंत्रणेच्या निदर्शनास आलेले नाही. तसेच वनविभागाचे निदर्शनास आलेले नाही. सदर वळतीकरणाचे क्षेत्र हे मयुरेश्वर अभयारण्यापासून प्रकल्पाचे अंतर (४३.४ कि.मी.) व माळढोक पक्षी अभयारण्यापासून प्रकल्पाचे अंतर (१३.० कि.मी.) दर्शविणारा नकाशा प्रस्तावासोबत (पृष्ठ क्रमांक ८८/४) जोडलेला आहे. |
| 4. | उपवनसंरक्षक यांनी पर्यायी वनीकरणासाठी मौजे कुंभारगाव, ता. इंदापूर, जि. पुणे येथील गट नं. १२० मधील १.०० हे. अवनत वनजमीन प्रस्तावित आहे. परंतु, प्रकल्प यंत्रणेने मौजे कुंभारगाव येथील गट नं. १२८ येथील जमीन पर्यायी वनीकरणाची असल्याचे हमीपत्र सादर केले आहे. सबब, नेमकी कोणती वनजमीन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केले आहे, याबाबत माहिती सादर करावी. | संदर्भ क्रं.5 अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी उपवनसंरक्षक यांनी प्रस्तावित केलेली मौजे कुंभारगाव, ता. इंदापूर, जि. पुणे येथील गट नं. १२० मधील १.०० हे. अवनत वनजमीन पर्यायी वनीकरणासाठी वापरण्यात येणार आहे सादर केले आहे. सुधारित हमीपत्र सोबत **Annexure-iii** जोडले आहे. |
| 5. | kml file च्या अवलोकनावरून प्रस्तावित क्षेत्रापैकी काही वनजमीन वहिवाटीखाली असल्याचे दिसते. सबब, सदर वनजमिनीवर अतिक्रमण आहे किंवा कसे, याबाबत माहिती सादर करावी. | संदर्भ क्रं.6 अन्वये वनपरिक्षेत्र अधिकारी (इंदापूर) यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सोबत जोडलेल्या यादीत नमूद गटातील क्षेत्र सन १९८० साली महसूल विभागाने वाटप केलेले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी (इंदापूर) यांचा अहवालानुसार यादी सोबत **Annexure-iv** जोडलेली आहे. |

सोबत – वरीलप्रमाणे 4 प्रतीत सादर.

(राहुल पाटील,भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रत – सहाय्यक वनसंरक्षक,(ववसं)पुणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत – वनपरिक्षेत्र अधिकारी,इंदापूर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत – General Manager-HR & ADMN BGPPL, Unit-Bhigwan, At-Bhigwan, Paundhwadi, Post-Bhigwan, Tal. Indapur, Dist-Pune यांना सादर.